सरकारी-निमसरकारी कर्मचारी-शिक्षक संघटना समन्वय समिती यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी पुकारलेल्या संपात सहभागी झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचा अनुपस्थितीचा कालावधी नियमित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संघटना १५१६/प्र.क्र.३९८/१६-अ
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ६ जानेवारी, २०१८.

वाचा :- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: संघटना १५१६/प्र.क्र.३३२/१६-अ, दिनांक ३० ऑगस्ट, २०१६.

प्रस्तावना :-

सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटना समन्वय समिती यांनी त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी १ दिवसाचा देशव्यापी लाक्षणिक संप करणार असल्याची नोटीस शासनास दिली होती. सदर संपामध्ये राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी सहभागी न होण्याचे आवाहन संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये करण्यात आले होते. या संपात सहभागी होऊन जे शासकीय अधिकारी/कर्मचारी कार्यालयात अनुपस्थित होते त्यांची अनुपस्थिती कशी नियमित करावी, ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार आता शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

शासन परिपत्रक :-

सरकारी-निमसरकारी कर्मचारी शिक्षक संघटना समन्वय समिती यांनी त्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात दिनांक २ सप्टेंबर, २०१६ रोजी पुकारलेल्या देशव्यापी लाक्षणिक संपामध्ये जे शासकीय अधिकारी/कर्मचारी सहभागी झाले होते, त्यांची अनुपस्थिती सेवेतील खंड न समजता असाधारण रजा म्हणून नियमित करावी मात्र सदर असाधारण रजेचा कालावधी वित्त विभाग दिनांक १५.१.२००१ च्या आदेशास अपवाद करुन हा कालावधी निवृत्तीवेतनासाठी अर्हताकारी सेवा म्हणून ग्राहय धरण्यात येऊ नये.

२. सदर परिपत्रक वित्त विभाग, अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२/१७/सेवा-६, दिनांक २०.१.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१८०१०६१६०६१७५८०७ हा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Tikaram Waman Karpate

Digitally signed by Tikaram Waman Karpate
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c97a9d6b23c34fddbfe8f6f6189c08328de56af131faf7d6c0a149c3a4cf1436, cn=Tikaram Waman Karpate
Date: 2018.01.06 16:09:52 +05'30'

(टि.वा.करपते)
उप सचिव,सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई-३२.

२. सर्व सन्माननीय विधानसभा/विधान परिषद व संसद सदस्य, महाराष्ट्र राज्य.
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई ३५.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई-३२.
५. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
६. मा.मुख्य सचिव, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
९. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
११. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१२. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, नागपूर व औरंगाबाद,
१३. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई ३२
१४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ३२
१५. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान परिषद), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई ३२
१६. प्रधान सचिव (महाराष्ट्र विधान सभा), महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२
१७. सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ३२
१८. महासंचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई ३२ (५ प्रती)
त्यांना विनंती की, प्रस्तुत शासन परिपत्रक प्रसिध्दीसाठी पाठवावे.
१९. सर्व महानगर पालिकांचे आयुक्त
२०. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका, महाराष्ट्र राज्य
२१. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य
२२. राज्यातील सर्व महामंडळे,मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक
२३. उपसचिव, (आस्थापना) सर्व मंत्रालयीन विभाग,मंत्रालय, मुंबई ३२
२४. संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय (बायोमेट्रिक उपस्थितीसंदर्भात),
२५. विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
२६. सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये, महाराष्ट्र राज्य (प्रत्येकी ५ प्रती)
२७. निवड नस्ती (कार्यासन १६-अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२